पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक ८

दिनांक: ०४/११/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोहेंबर २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०४/११/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.सौ.काळभोर वैशाली जालिंदर - सभापती
२. मा . शारदा प्रकाश बाबर
३. मा. जावेद शेख
४. मा. पांढकर निलेश
५. मा. नेटके सुमन राजेंद्र
६. मा. भोंडवे संगीता राजेद्र
७. मा. प्रसाद शेट्टी
८. मा. झांबरे सतिश (स्विकृत सदस्य)
९. मा. कुटे गिरीष (स्विकृत सदस्य)
१०. मा. भोंडवे बेबीनंदा (स्विकृत सदस्या )

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर -क्षेत्रीय अधिकारी, श्री. लियाकत पिरजादे,कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. संजय भोसले , श्री. बन्सल एच.पी. उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्रीमती. मोमीन, उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री. प्रदीप पुजारी, उपअभियंता ,झोनिपु- स्थापत्य, श्री. शिंदे एच.एस. उपअभियंता, जलनि:स्सारण, श्री.पांडुरंग जाधव, लेखाधिकारी, श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री. शितोळे एस.के. कनिष्ठ अभियंता, झोनिपु स्थापत्य, श्री. ज्ञानोबा कांबळे, उद्यान सहाय्यक, उदयान विभाग उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर हा प्रभाग " शुन्य कचरा प्रकल्प " योजनेसाठी निश्चित करणे बाबत..

**ठराव क्रमांक : ३६** **विषय क्रमांक : १**

दिनांक : ०४/११/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. सुमन राजेंद्र नेटके अनुमोदक : मा.बाळासहेब जयवंत तरस

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर

रुंद रस्त्यास "हस्तीमल शेठ गादिया मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०४/११/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

**ठराव क्रमांक : ३७** **विषय क्रमांक : २**

दिनांक : ०४/११/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. संगिताताई भोंडवे अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ किवळे (मुकाई चौक) मधील बस टर्मिनलचे " मुकाई बस टर्मिनल " असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०४/११/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्रमांक : ३८** **विषय क्रमांक : ३**

दिनांक : ०४/११/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. निलेश पांढरकर अनुमोदक : मा. वैशालीताई काळभोर

संदर्भ : मा. निलेश शंकरराव पांढकर यांचा दि. २/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं. १७९ पैकी मध्ये आरक्षण क्रमांक २७३ हे प्राथमिक शाळा हे आरक्षण असून सदर आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्या आगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाच्या आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्र. २७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा. शहर सुधारणा समिती मार्फत मा. महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणे.

(दिनांक ०४/११/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**ठराव क्रमांक : ३९** **विषय क्रमांक : ४**

दिनांक : ०४/११/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. वैशालीताई काळभोर अनुमोदक :मा सुमनताई नेटके

संदर्भ : मा. वैशालीताई काळभोर यांचा दिनांक ०४/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरापलिका कार्यक्षेत्रात ओला व सुका कचरा वेगवेगळा साठविण्यासाठी JNNURM अंतर्गत उपलब्ध निधीतून ७ लीटर क्षमतेचे प्रति कुटुंब दोन प्लॉस्टीक डस्ट बिन देणेत आले आहेत. त्याचप्राणे घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी Tata ACE वाहने उपलब्ध आहेत. नागरिकांनी ओला व सुका तृकचरा वेगवेगळा साठविणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यावर स्वतंत्रपणे प्रक्रिया करणे सोपे होऊन कचरा डेपोवर टाकल्या जाणा-या मिस्त्र स्वरुपाच्या कच-याचे प्रमाण कमी होईल पर्यायाने कचरा वहातुकीवर होणार खर्च कमी होऊन कचरा डेपोची जागा जादा कालावधीसाठी वापरता येणे शक्य होईल. तथापि नागरिकमध्ये ओला वसुाक अलगीकरणाबाबत नागरिकामध्ये जनजागरण होणे आवश्यक आहे यासाठी मनपाकडून मे. जनवाणी या मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ॲन्ड अग्रीकल्चर यांचेशी सलग्न संस्थेची नेमणुक करणेत येत आहे. प्र.म प्रयोगिक तत्वावर प्रतेक क्षेत्रीय कार्यालयाकडील एका निवडणुक प्रभागामध्ये " शुन्य कचरा वॉर्ड " प्रकल्प राबविणेत येणार असून यासाठी प्रत्यके क्षेत्रीय कार्यालयाकडील एक निवडणुक प्रभाग यायोजनेसाठी कळविणे बाबत आरोग्य मुख्य कार्यालयाकडून कळविणेत आले आहे. त्या नुसार अ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर हा प्रभाग " शुन्य कचरा प्रकल्प " योजनेसाठी निश्चित करणे बाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/३५९ /२०१५
दिनांक : ०५/१२ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती